**नि.क्र.१४५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ याची जबानी –**
**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

माझे नांव : मधुकर भिकाजी सावंत
वय सुमारे : ५५ वर्षे, धंदा – पिटीशन रायटर व शेती
निवासस्थान : राहा.वराड, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग

---

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा सरकारी अभियोक्ता श्री.माजगावकर यांचे मार्फत –**

**०१.** मी सन १९९७ सालापासून पिटीशन रायटर म्हणून ओरोस येथील न्यायालयात काम करीत आहे. सन २०१२ साली पोलीसांनी मला गायतोंडेच्या प्रकरणात ओरोस पोलीस ठाणे येथे बोलावले होते. तेथे गेल्यानंतर पोलीसांनी मला खरेदीखत दाखविले. सदरचे खरेदीखत हे शेत जमीन सर्वे नं.२७, हिस्सा नं.६ याबाबतीत होते. सदरचे खरदेखत पोलीसांनी मला दाखविण्याचे कारण म्हणजे, सदर खरेदीखताचा दस्त हा माझे गावतील शामसुंदर विष्णू वराडकर यांनी मसुदा तयार केला होता. मी खरेदीखतावर गुरुनाथ गायतोंडे व सुरेश जर्नादन गायतोंडे यांना ओळख दिलेली आहे. सुरेश जर्नादन गायतोंडे यांच्या नावाची सही राजन नारायण गायतोंडे यांनी केली होती व सुरेश जनार्दन गायतोंडे यांचा फोटो खरेदीखताला लावलेला होता. मी ज्यावेळी खरेदीखतावर ओळख घातली त्यावेळी ओळखपत्र न पहाता मी ओळख घातलेली होती. मी ओरोस पोलीस ठाणे येथे गेल्यानंतर मला खरेदीखत बनावट तयार केल्याचे पोलीसांनी सांगीतले व त्याबाबत फिर्यादी झीलू गावडे यांनी फिर्याद दिल्याचे सांगीतले. पोलीसांनी चौकशी करुन जबाब नोंदविला आहे. ज्यावेळी मी खरेदीखतावर खरेदी देणार व खरेदी घेणार यांच्या ओळखी घातल्या त्यावेळी खरेदी देणार व घेणार हे समक्ष हजर होते. राजन नारायण गायतोंडे यांना दाखविल्यास मी ओळखू शकणार नाही. मी गुरुनाथ गायतोंडे यांना सुध्दा दाखविल्यास ओळखू शकणार नाही. सदर घटनेला १६ वर्षे झालेली आहेत त्यामुळे मी राजन गायतोंडे व गुरुनाथ गायतोंडे यांना ओळखू शकणार नाही. सदरच्या व्यक्ती खरेदीखताच्या वेळी एकदाच आले होते त्यामुळे मला त्यांना ओळखणे शक्य नाही.

**०२.** मी खरेदीखतावर केलेली सही मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला नि.१३६ वरील खरेदीखताची प्रमाणीत प्रत दाखविली. त्यावर माझी सही ओळख देणार म्हणून आहे. सदर खरेदीखताची प्रमाणीत प्रत मी पोलीस स्टेशनला पाहीलेली आहे. खरेदीखतावर माझे व्यतिरिक्त आणखी दुसरा व्यक्ती लक्ष्मण लवू वराडकर यांनी सुध्दा खरेदी देणार व घेणार यांची ओळख दिलेली आहे. तथाकथीत खरेदीखताच्या दस्तावर खरेदी घेणार व खरेदी देणार यांनी सहया केलेल्या आहेत. सुरेश जर्नादन गायतोंडे मयत असताना राजन नारायण गायतोंडे यांनी खरेदीखतावर सुरेश जर्नादन गायतोंडे यांच्या जागी सही केलेली आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपी तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री.एस. एस. सावंत यांचे मार्फत</u> –**

**०३.** सन १९९७ साला पासून आजपर्यत मी हजारो ओळख म्हणून सहया केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या व्यक्ती करीता ओळख म्हणून सही केलेली आहे त्यांना मी ओळखत नव्हतो. मी खरेदीखताच्या दस्त नोंदणीचे काम स्वत: करतो. हे म्हणणे खरे आहे की, दस्ताला ओळख ही दुयम निबंधक कार्यालयात संबंधीत अधिकारी यांचे समोर दिली जाते. हे म्हणणे खरे आहे की, दुयम निबंधक कार्यालयात दुयम निबंधक यांचे समोर मी हा व्यक्ती सुरेश गायतोंडे आहे व हा व्यक्ती राजन नारायण गायतोंडे आहे अशी ओळख घातलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, खरेदी खताच्या दस्तावर मी ओळख म्हणून कधीही सहया केलेल्या नाहीत असे म्हटल्यास बरोबर होईल. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतावर मी ज्यावेळी सही केली त्यावेळी जे लिहून देणार व लिहून घेणार हे प्रत्यक्ष हजर होते किंवा नाही हे मी निश्चीतपणे सांगू शकत नाही.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांना जबाब देते वेळी, खरेदीखताचा दस्त लिहून देते वेळी लिहून देणार व लिहून घेणार हे हजर होते याबाबत मी सांगीतलेले नव्हते. मी पोलीसांना जबाब देताना सांगीतले नव्हते की, सुरेश जनार्दन गायतोंडे मयत झाल्यानंतर राजन नारायण गायतोंडे यांनी त्यांची सही खरेदीखतावर केली होती. मी पोलीसांना सांगीतले नव्हते की , राजन गायतोंडे यांची सही व सुरेश गायतोंडे यांची सही ही एकसारखी नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २००९ या काळात ओळखपत्र घेवून येण्याचा लोकांमध्ये प्रघात नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, शामसुंदर वराडकर हे माझेकडे बरेच दस्त ओळखीसाठी घेवून येत असत. शामुसुंदर वराडकर हे तहलिस कार्यालय, कुडाळ येथे स्टॅम्प व्हेंडर म्हणून काम करतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या हिताविरुध्द सरतपासात सांगीतलेला मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>फेरतपास</u> –** नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

TIDKE AMARDEEP DADARAO
Digitally signed by TIDKE AMARDEEP DADARAO
Date: 2025.04.16 17:28:10 +0530

( अे.डी.तिडके )
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.

ठिकाण :– ओरोस
दिनांक :–१६/०४/२०२५.